**<u>फौजदारी किरकोळ अर्ज नं. ९७/२०१४ मधील नि.क्र.३३ खालील आदेश</u>**

(मानिनी जाधव वगैरे वि. जितेंद्र जाधव वगैरे )

१. अर्जदार हिने सदरचा अर्ज सरंक्षण, दरम्यानची पोटगी व इतर दाद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदारचे थोडक्यात कथन असे की,</u>**

२. अर्जदार क्रं.१ व जाबदार क्रं.१ यांचा विवाह दि.१२.०५.१९९५ रोजी हिंदू धर्मशास्त्रा व रुढी परंपरेनुसार विटा येथील भैरवनाथ मंगम कार्यालय येथे झाला होता. सदर विवाह कु.अक्षरा ही मुलगी व कु.सार्थक हा मुलगा झाला आहे. जाबदार क्रं.२ व ३ हे अर्जदारचे सासरे व सासू तर जाबदार कं.४ व ५ या अर्जदारच्या जावा आहेत. अर्जदार क्रं.२ कु.सार्थक हा जन्मापासून शारीरिकदृष्टया व बौध्दिकदृष्टया आजारी असल्यामुळे त्याचेवर वैद्यकीय उपचार करावे लागतात व अशा परिस्थितीत कु.अक्षरा हिचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होवून नये अर्जदारने क्रं.१ ने तिला माहेरी चैन्नई येथे ठेवले आहे.

३. विवाहानंतर केवळ दोन वर्षे जाबदार क्रं.१ ने अर्जदार क्रं.१ हीस व्यवस्थित नांदविले. त्यानंतर अर्जदार क्रं.१ हिच्यातील इंटरेस्ट संपला असे बोलून जाबदार क्रं.१ ने व्यवसायासाठी अर्जदार क्रं.१ हिला माहेरहून लाखो रुपये घेवून येणेबाबत मागणी केली. अर्जदार क्रं.१ हिने यास नकार दिला असता जाबदार क्रं.१ हा अर्जदारांना टोचून बोलणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे, लेदर बेल्टने फटके मारणे असे प्रकार सुरु केले. जाबदारांनी दिलेल्या त्रासामुळे अर्जदार क्रं.१ हिला इतर अर्जदारांसोबत पुणे येथे राहावे लागले. तिने तिच्या भविष्याचा विचार करुन सन २००७ मध्ये सासरच्या घरी राहण्यास आली असता जाबदारांनी तिला घरात

घेतले नाही. यालउट तिला घराच्या पहिल्या मजल्यावर ३०० चौ.फुट क्षेत्राच्या दोन खोल्यांमध्ये राहण्यास भाग पाडले. अर्जदारला जाबदारांनी तिरस्काराची दुय्यम उपेक्षित वागणुक दिली. अर्जदार ही मुलांच्या भविष्याचा व संस्कारांचा विचार करुन आज ना उद्या जाबदार क्रं.१ च्या वर्तनामध्ये बदल होईल या आशेने त्यांच्यासोबतच राहत होती. परंतु, जाबदार क्रं.१ याने अर्जदार विरुध्द घटस्फोटाचा अर्ज दाखल केला यावरुन तिला जाबदार क्रं.१ ला तिच्यासोबत राहायचे नाही असे स्पष्ट झाले.

४. अर्जदारला असे समजून आले की सोनाली अंकुश काटे या परस्त्रीशी जाबदार क्रं.१ चे अनैतिक संबंध आहेत. तो तिच्या सोबत रामनगर विटा येथे एका घरात उघडपणे राहत आहे. यासंबंधाला अर्जदारने विरोध केला असता जाबदार क्रं.१ ने अर्जदारचा अपमान व मारहाण करुन धमकी दिली. इतर जाबदार, जाबदार क्रं.१ ला समजावण्याचा कोणताही प्रयत्न करीत नाहीत. त्यातच अर्जदार क्रं.१ ने जाबदार क्रं.१ च्या विरुध्द सांगली येथे सासरच्या मिळकतीमधून तिला हिस्सा मिळण्यासाठी अर्ज दाखल केला त्यावेळी तिला पोटगी देण्यासाठी दरमहा रु.३०००/- देण्याचा अंतरिम आदेश झालेवर जाबदार हे अर्जदारवर अधीकच चिडले व तिला अशी धमकी दिली की, केस मागे घे, अन्यथा तुला जिवंतच ठेवत नाही. दि.३१.१२.२०१३ रोजी अर्जदार ही वकीलांना भेटायला गेली असता जाबदार क्रं.१ व २ यांनी तिला घरासमोर अडविले व मारहाण केली, तिच्या हातातील पर्स व रोख रक्कम रु.२०,०००/- हिसकावून घेतले. त्याचदिवशी सायंकाळी ०६.०० वा. देखील जाबदार क्रं.१ व २ यांनी घरासमोर अडवून मारहाण केली. याबाबत तिने विटा पो.ठाणेमध्ये फिर्याद दाखल केलेली आहे.

५. अर्जदार ही पहिल्या मजल्यावर राहत असताना जाबदाराने तिला पाणी पुरवठा बंद करुन, शिवीगाळ करुन, रात्री अपरात्री दार वाजवून, दाराला कुलूप लावून अशा प्रकारे त्रास देवून सदरचे घर सोडण्यास भाग पाडले. अर्जदार सध्या

राहत असलेल्या दोन खोल्या अतिशय अपु–या असून पहिल्या मजल्यावर आणखी एक रिकामा हॉल आहे तो जाबदारांनी बंद करुन ठेवला आहे. दोन खोल्यासांठी स्वतंत्र मिटरवरुन विज पुरवठा होण्याची तरतुद जाबदारांनी केलेली आहे. या सर्व कारणास्तवर अर्जदारला सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. या अर्जाने तिने जाबदारांविरुध्द संरक्षण आदेश व प्रत्येक २५००/– पोटगी, तसेच पहिल्या मजल्यावर असणारा रिकामा हॉल उघडून मिळणेसाठी तसेच अर्जदार राहत असलेल्या पहिल्या मजल्यावरील जागेमध्ये जागदारांच्या तळमजल्यावरील हौदातून एक स्वतंत्र पाणी कनेक्शन करुन मिळणेसाठी व पहिल्या मजल्यावर असणा–या खोलीमध्ये स्वतंत्र विज कनेक्शन अर्जदारच्या नावे घेणेबाबत जाबदार क्रं.१ विरुध्द आदेश होणेसाठी दाखल करावा लागला आहे, त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. यालउट जाबदारांनी नि.३८ कडे म्हणणे दाखल केले आहे. त्याप्रमाणे त्याचे थोडक्यात कथन असे की, जाबदार याची गार्डी येथे थोडीशी अल्पप्रमाणात शेती आहे. सन २००५ पासून जाबदार क्रं.१ चा सिव्हील कॉट्रॅक्टरचा व्यवसाय त्याला पुर्णपणे बंद करावा लागला. सन २००० पर्यंत जाबदार क्रं.१ हा त्याच्या आई–वडीलांसोबत सह्याद्री बिल्डींगमध्ये त्याचे वडील उत्तम हंबीरराव जाधव यांच्या हिश्याच्या जागेत राहत होता. परंतु, सन २००० नंतर त्याला गार्डी येथील शेताच्या घरामध्ये एकटेच रहावे लागत आहे. सन २००० पर्यंत अर्जदार क्रं.१ ही देखील जाबदार क्रं.१ च्या संपुर्ण कुटूंबासोबत एकत्र राहत होती, पण त्यानंतर अर्जदार क्रं.१ व जाबदार क्रं.१ या जागेमधील पहिल्या मजल्यावर एका खोलीत राहू लागले. जाबदार क्रं.१ याला आई, भाऊ, भावाची पत्नी, मुले अशा अनेक जबाबदा–या आहेत. अर्जदारामुळे जाबदारांच्या एकत्र कुटूंबामध्ये कलह निर्माण झालेले आहेत. अर्जदार क्रं.१ चे वडील अतिशय श्रीमंत आहेत. त्यामुळे ती सर्वांना सोडून पुणे येथे तिच्या वडीलांच्या फ्लॅटमध्ये राहत आहे.

तिचे वडील अतिशय श्रीमंत असल्यामुळे त्यांचा मद्रास येथे सोन्या–चांदीचा कारखाना आहे, अर्जदारचा भाऊ डॉक्टर आहे. अर्जदार ही जाबदारांच्यावर विनाकारण छोट्या मोठ्या गोष्टींवरुन असह्य असे आरोपी केलेले आहेत. तसेच तिने जाबदारांच्याविरुध्द वेगवेगळ्या तक्रारी व गुन्हे नोंद केलेले आहेत. अर्जदार ही अतिशय उर्मट स्वभावाची आहे. याउलट तिच जाबदार क्रं.१ सोबत उर्मटपणे बोलून जाबदार क्रं.१ च्या अंगावर धावून जावून हातात मिळेल त्या गोष्टीने मारहाण करत. त्यामुळे वेगळे राहण्याचा निर्णय हा केवळ अर्जदारच्या स्वभावामुळे घ्यावा लागला. दि.१८.०६.२००५ रोजी निवडणुकीचा काळ असल्यामुळे जाबदार क्रं.१ ला घरी यायला उशीर झाला त्यावेळेस त्याला अर्जदार राहत असलेल्या खोलीमध्ये कुजबुज ऐकू आली म्हणून मुलगा रडत आहे, तु उठ म्हणून तिला हाका मारल्या व काहीही उत्तर न आल्यामुळे जाबदारला शंका आली व त्याने त्याच्या आईला बोलवून घेतले. त्यांनाही दार उघडले नाही म्हणून जाबदाराचे मामा–मामी यांना देखील बोलविले परंतु अर्जदारने दार उघडले नाही. जेंव्हा तिला दार तोडण्याची धमकी दिली तेंव्हा तीने दार उघडले व जाबदारने आत जावून तेथे पाहिले असता वैभव जाधव व अर्जदार ही अर्धनग्नावस्थेत होते. या सर्व गोष्टींचा जाबदार क्रं.१ वर आघात झाला. त्यामुळे त्याला सांगली येथील मानसोपचार तज्ञ डॉ.गुप्ते यांच्याकडे औषधोपचार घ्यावे लागत आहेत.

७. त्यानंतर जाबदार हा विटा येथील प्रतिष्ठीत नागरीक असल्यामुळे घडलेल्या घटनेबाबत कोठेही तक्रार देण्याची टाळले. दि.२६.०१.२००७ रोजी अर्जदार ही मुलगा सार्थक यास घेवून जाबदारचे वडील उत्तमराव यांच्या घरामध्ये जबरदस्तीने घुसून राहिली. त्याच दिवशी तिने जाबदारांच्या घरातील साहित्य बाहेर फेकून दिले व सर्वांवर हुंडाबळी व मारहाणीची केस करुन जेलमध्ये पाठवीन अशी धमकी दिली. त्यानंतरही अर्जदार क्रं.१ ही या–ना त्या प्रकारे राहून वैभव सोबत अनैतिक सबंध पुर्ववत सुरु ठेवले. त्यामुळे अर्जदार ही जाबदारांच्याविरुध्द अनैतिक

संबंधामध्ये अडचण येवू नये म्हणून संरक्षणात्मक आदेश मागत आहे. तसेच, इतरत्र भाड्याने राहून चर्चा व्हायला नको म्हणून सह्याद्री बिल्डींगमध्ये खोल्या मोकळ्या करुन रहायला मागत आहे. अर्जदार हिचे शिक्षण लग्नाच्यावेळेस १२ वी पर्यंत झाले होते. त्यानंतर तिच्या दहशतीमुळे जाबदारने तिला पुढचे शिक्षण कोणत्या कॉलेजला घेतले हे विचारलेले नाही. अर्जदार हिने पोटगीसाठी वेगळ्या पध्दतीने दाखल केलेल्या अर्जामधून रक्कम रु.३०००/– मिळत आहे, त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे. इतर जाबदारांनी देखील अशाच स्वरुपात त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

८. अर्जदार तर्फे विधीज्ञ एस.आर.जाधव व जाबदार क्रं.१ तर्फे विधीज्ञ डी.बी.शितोळे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच, अर्जदार व जाबदार यांनी अवलोकनार्थ केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, जाबदारने अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदारचा छळ केलेला आहे व तिला सासरचे घर सोडून जाण्यास परावृत्त केलेले आहे. जेंव्हापासून तिने घर सोडले आहे तेंव्हापासून तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय जाबदारने केलेली नाही. या कारणास्तव दरम्यानची पोटगी मंजूर होणेची विनंती केलेली आहे. याउलट जाबदारतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हिचे वैभव जाधव याचेशी अनैतिक संबंध असलेने तीने स्वतःहून जाबदारांचा त्याग केला आहे. केवळ जाबदाराला त्रास देणेचे हेतुने व खर्चात पाडणेचे हेतुने सदरचा अर्ज केला असलेने अर्जदारांचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

९. अर्जदार व जाबदार यांची कथने पाहता प्रथमदर्शनी अर्जदार क्रं.१, २ व जाबदार यांचे नाते शाबीत होते. तसेच, अर्जदार हे जाबदार पासून विभक्त राहत असल्याचे देखील शाबीत होते. त्याचप्रमाणे अर्जदार क्रं.१ हीने सदर अर्जाबरोबर दाखल केलेल्या शपथपत्रावरुन अर्जदार क्रं.१ हिचा जाबदार याने अर्जात

नमूद केलेप्रमाणे छळ केला असल्याचे सिध्द होते. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार क्रं.१ च्या म्हणण्याला पुष्टी मिळत आहे. केस फाईलची पडताळणी केली असता जाबदारने अर्जदारच्या उदरनिर्वाहासाठी पैसे दिल्याबाबतचा कोणताही पुरावा दिसून येत नाही. सदर अर्जाबाबत दोन्ही बाजूंचा पुरावा येवुन निकाल लागण्यास बराच कालावधी लागेल असे दिसून येते. त्यामुळे जाबदारने अर्जदारांना दरम्यानची पोटगी देणे आवश्यक आहे. या उलट जाबदाराचे असे कथन आहे की, अर्जदारहीने जाबदारांचा स्वतःहून त्याग केला असून अर्जदारचे वडील हे अतिशय श्रीमंत असल्याचे कथन केले आहे. परंतु याठिकाणी एक गोष्ट नमुद करणे आवश्यक आहे की, अर्जदार क्रं.१ ही जाबदार याची पत्नी असून अर्जदार क्रं.२ हा त्याचा मुलगा आहे व त्यांच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी जाबदार याची पती व वडील या नात्याने आहे व ती जबाबदारला टाळता येणार नाही. याउलट जाबदारांनी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही सदन घरामधील असल्याचे अभिलेखावर ठेवलेले नाही किंवा तसा सकृतदर्शनी पुरावा आणलेला नाही. त्यामुळे मला अर्जदारतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद हा विश्वासार्ह वाटतो. या सर्व कारणास्तव जाबदारने अर्जदारांना दरमहा दरम्यानची पोटगी म्हणून रक्कम अर्जदार क्रं.१ हीस रक्कम रू.२०००/– (दोन हजार) व अर्जदार क्रं.२ यास रक्कम रु.२००० (दोन हजार) दयावेत असा आदेश करणे योग्य वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार क्रं.१ यास आदेशीत करण्यात येते की, त्याने मुळ अर्ज दाखल तारखेपासून ते अर्ज निकाली होईपर्यंत अर्जदारांना दरम्यानची पोटगी म्हणून दरमहा अर्जदार क्रं.१ हीस रक्कम रू.२०००/– (दोन हजार) व अर्जदार क्रं.२ यास रक्कम रु.२००० (दोन हजार) दयावेत.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदारांना विना मोबदला देण्यात यावी.

स्वाक्षरी/–

**विटा** **(गीता प्रविण बनकर)**

दिनांक १९–०५–२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,विटा.